# मंत्रिमंडळ निर्णय
# १२ जून, २०१३
## (मंत्रिमंडळ बैठक क्र. १२२)

| क्र. | विषय | विभाग |
|---|---|---|
| १ | जूनच्या सरासरीच्या ३७ टक्के पाऊस; पेरणीपूर्व कामे जोरात | मदत व पुनर्वसन |
| २ | पुणे येथे ३ ते ७ जुलैमध्ये आशियाई ॲथलेटिक्स चॅम्पियनशिप स्पर्धा | क्रीडा |
| ३ | १९८६ पूर्वीच्या एम.फिल पदवीधारक अध्यापक एक आगाऊ वेतनवाढ मंजुरीस मान्यता | उच्च व तंत्र शिक्षण |
| ४ | राज्य पुरस्कृत सूक्ष्म सिंचन योजना राबविण्यास मान्यता | कृषी |
| ५ | महाविद्यालय मंजूरीची प्रक्रिया १५ जुलैपर्यंत चालू राहणार | शालेय शिक्षण |

## जूनच्या सरासरीच्या ३७ टक्के पाऊस; पेरणीपूर्व कामे जोरात

राज्यात मान्सूनचे आगमन झाले असून जून महिन्याच्या सरासरी २२२.१ मि.मी. पावसाच्या तुलनेत आजपर्यंत ८१.२ मि.मी. म्हणजेच ३६.६ टक्के पाऊस झाला आहे. १ ते १० जून अखेर एकूण ३५५ तालुक्यांपैकी २५ तालुक्यात २५ टक्क्यांपेक्षा कमी पाऊस झाला असून २९ तालुक्यात २५ ते ५० टक्के, ५६ तालुक्यात ५० ते ७५ टक्के आणि ६८ तालुक्यात ७५ ते १०० टक्के पाऊस झाला. एकंदर १७७ तालुक्यात १०० टक्क्यांपेक्षा अधिक पाऊस झाला, हे तालुके विभागनिहाय असे आहेत : कोकण विभाग- २९, नाशिक- २८, पुणे-२९, कोल्हापूर-२२, औरंगाबाद-१२, लातूर-२२, अमरावती-२७ आणि नागपूर-८.

### पेरणीपूर्व कामे सुरु

राज्यात खरीपाचे सरासरी क्षेत्र १३४.६९ लाख हेक्टर असून, पेरणीपूर्व मशागतीची कामे जोरात सुरु आहेत. ०.३ टक्के क्षेत्रावर पेरणी झाली आहे. कोकण, कोल्हापूर व पुणे विभागात भात रोपवाटीका तयार करण्याचे काम सुरु आहे. कापसाची पेरणी ३३,६०० हेक्टर क्षेत्रावर, सोयाबिनची पेरणी १४०० हेक्टर क्षेत्रावर तसेच भात पिकाची ८००० हेक्टर क्षेत्रावर पेरणी झाली आहे.

### खते, बियाणे उपलब्ध

खरीपासाठी बियाणांची गरज निश्चित करण्यात आली असून १४.४७ लाख क्विंटल म्हणजे मागणीच्या ७५ टक्के बियाणे पुरवठा झाला आहे. खतांच्या बाबतीतही ४५ टक्के पुरवठा करण्यात आला आहे.

### टँकर्सच्या संख्येत किंचित घट

एकंदर ४,४८२ गावे आणि १०,८८२ वाड्यांना ५,४५६ टँकर्स पाणी पुरवठा करीत आहेत. मागील आठवड्यापर्यंत सुमारे ५५०० टँकर्स होते. गेल्या वर्षी याच सुमारास २,५५४ टँकर्स होते. पाणी पुरवठा विभागास टंचाई परिस्थितीत पाणी पुरवठा योजनेसाठी २०१२-१३ मध्ये ५१३ कोटी ९८ लाख इतका निधी देण्यात आला असून एप्रिल व मे २०१३ या दोन महिन्यांकरिता २०१ कोटी ८० लाख इतका निधी देण्यात आला आहे.

### साडेआठ लाख जनावरे छावणीत

राज्यातील ११ (अहमदनगर, औरंगाबाद, जालना, परभणी, बीड, उस्मानाबाद, पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, बुलढाणा) जिल्ह्यांमध्ये जनावरांच्या १,२४४ छावण्या सुरु आहेत. चारा वितरणावर आतापर्यंत एकूण ११२५ कोटी इतका खर्च झाला आहे. या छावण्यात ७ लाख ३५ हजार ७४३ मोठी आणि १ लाख १० हजार ५९६ लहान अशी ८ लाख ४६ हजार ३३९ जनावरे आहेत.

टंचाई परिस्थितीत लोकांना गावातच रोजगार उपलब्ध व्हावा या दृष्टीने महाराष्ट्र राज्य ग्रामीण रोजगार हमी योजनेखाली एकूण २७ हजार ६४४ कामे सुरु असून या कामावर ४ लाख १९ हजार ४८३ मजूर काम करीत आहेत.

**१४ टक्के पाणी साठा**

राज्यातील विविध जलाशयात पाणी साठ्याची १० जूनची स्थिती पुढीलप्रमाणे:- कोकण ३५ टक्के (गतवर्षी २७ टक्के), मराठवाडा ४ टक्के (गतवर्षी ६ टक्के), नागपूर २४ टक्के(गतवर्षी २२ टक्के), अमरावती १९ टक्के (गतवर्षी १५ टक्के), नाशिक ७ टक्के (गतवर्षी ६ टक्के), पुणे ११ टक्के (गतवर्षी ११ टक्के) इतर धरणांमध्ये २३ टक्के (गतवर्षी २४ टक्के)

----०----

## पुणे येथे ३ ते ७ जुलैमध्ये
## आशियाई ॲथलेटिक्स चॅम्पियनशिप स्पर्धा

महाराष्ट्रात जुलै २०१३ मध्ये २० वी आशियाई ॲथलेटिक्स चॅम्पियनशिप स्पर्धा आयोजित करण्यास मंत्रिमंडळाने आज मान्यता दिली. पुणे येथे ३ ते ७ जुलै या कालावधीत पुणे येथे आयोजित होणाऱ्या या स्पर्धेसाठी १८ कोटी रुपये इतका खर्च अपेक्षित आहे.

ॲथलेटिक्स फेडरेशन ऑफ इंडिया या संस्थेतर्फे आयोजित केली जाणारी ही स्पर्धा सुरवातीला तामीळनाडू येथे होणार होती. मात्र, तामीळनाडू शासनाने नकार दिल्यानंतर दिल्ली शासनाने देखील या स्पर्धेच्या आयोजनात असमर्थता दर्शविली. त्यानंतर फेडरेशनने ही स्पर्धा महाराष्ट्रात आयोजित करण्याविषयी विनंती केली. या स्पर्धेबाबतीत मुख्यमंत्र्यांनी केंद्र शासनाच्या क्रीडा सचिवांशीही चर्चा केली होती. राज्याने सर्वसमावेशक असे नवीन क्रीडा धोरण जाहीर केले असून खेळाच्या विकासाला प्राधान्य देण्याच्या दृष्टीने या स्पर्धेच्या आयोजनाचा निर्णय घेण्यात आला.

स्पर्धेच्या यशस्वी आयोजनाच्या दृष्टीने विविध समित्यांची नियुक्ती करण्यात येत असून देशाच्या दृष्टीने प्रतिष्ठेच्या या स्पर्धेसाठी सर्व संबंधित यंत्रणांनी नियोजन करण्याचे निर्देश यावेळी देण्यात आले.

-----०-----

उच्च व तंत्रशिक्षण

## १९८६ पूर्वीच्या एम.फिल पदवीधारक अध्यापक
## एक आगाऊ वेतनवाढ मंजुरीस मान्यता

१९८६ पूर्वी सेवेत असलेल्या आणि त्यापूर्वी एम.फिल पदवी धारण करणाऱ्या अध्यापकांना १ जानेवारी १९८६ पासून पूर्वलक्षी प्रभावाने एक आगाऊ वेतनवाढ मंजूर करण्याचा निर्णय झाला. ही वेतनवाढ अकृषी विद्यापीठे व संलग्नित अनुदानीत अशासकीय महाविद्यालयातील अधिव्याख्यात्यांना लागू होईल. यासाठी येणाऱ्या २ कोटी १० लाख रुपये या खर्चासही मान्यता देण्यात आली.

कोल्हापूरच्या शिवाजी विद्यापीठ शिक्षक संघाने या संदर्भात ६ ऑक्टोबर २००८ रोजी शासनास निवेदन सादर केले होते. या अनुषंगाने मुंबई उच्च न्यायालयात याचिकाही दाखल करण्यात आली होती.

----०----

## राज्य पुरस्कृत सूक्ष्म सिंचन योजना राबविण्यास मान्यता

केंद्र शासनाच्या योजनेशी समांतर अशी राज्य पुरस्कृत सूक्ष्म सिंचन योजना राबविण्यास आज मंत्रिमंडळाने मान्यता दिली. वर्ष २०१३-१४ पासून ही योजना कार्यान्वित करण्यात येईल व त्याकरिता एकूण ४७० कोटी रुपये उपलब्ध करून देण्यात येतील. ज्या शेतावर सूक्ष्म सिंचन संच बसविण्यात येत आहेत त्याची नोंद महसूल अभिलेखात घेण्यात येईल तसेच या योजनेचे संनियंत्रण कृषी विभाग करेल.

राज्यातील शेतकऱ्यांकडून सुक्ष्म सिंचन संचांची मागणी मोठ्या प्रमाणात आहे.तथापि, केंद्र पुरस्कृत राष्ट्रीय सुक्ष्मसिंचन अभियान अंतर्गत मागणीच्या प्रमाणात निधी उपलब्ध होत नसल्यामुळे, निधी अभावी मोठ्या प्रमाणात प्रस्ताव प्रलंबित राहत आहेत. हीबाब विचारात घेऊन राज्यपुरस्कृत सुक्ष्मसिंचन योजना राबविण्याचे राज्यशासनाने निश्चित केले आहे.

राज्य योजना कार्यान्वित करण्यासाठी २०१४-१५ पासून प्रत्येक वर्षी २५० कोटी रुपये निधी केंद्र शासन, डीपीडीसीचा निधी वापरून व राष्ट्रीय कृषी विकास योजना मधून उपलब्ध करून देण्यात येईल. सदर योजना कोकण, मराठवाडा व विदर्भातील गोंदिया, गडचिरोली व भंडारा जिल्ह्यांमध्ये राज्य योजना म्हणून राबविण्यात येईल. त्यासाठी राष्ट्रीय सुक्ष्म सिंचन अभियानांतर्गत व विदर्भ सधन सिंचन विकास कार्यक्रम (VIIDP), राष्ट्रीय कृषी विकास योजना (RKVY) अंतर्गत केंद्र शासनाचा निधी, प्रथम संपूर्ण राज्यासाठी व आवश्यकतेनुसार राज्य शासनाचा निधी वापरण्यात येईल.

सद्यस्थितीत इतर राज्याच्या तुलनेत महाराष्ट्राची सिंचनाची टक्केवारी खूपच कमी आहे.उपलब्ध पाण्याचे योग्य नियोजन करावयाचे झाल्यास सिंचनाची टक्केवारी वाढविणे क्रमप्राप्त आहे.त्यासाठी ठिबक सिंचन व तुषार सिंचन या तंत्रांचा अवलंब करणे आवश्यक झाले आहे. असे करण्याने उत्पादन व उत्पादकता यामध्ये वाढ होण्यास मदत होणार आहे. तसेच मोठया प्रमाणात वीजेची बचतदेखील होणार आहे. महाराष्ट्रामध्ये तण काढण्यासाठी मजूरांचा प्रश्न भेडसावत असून सदर तंत्रज्ञानामुळे मजूरांचाही प्रश्न निकाली निघणे शक्य होणारआहे.

-----o-----

## महाविद्यालय मंजूरीची प्रक्रिया १५ जुलैपर्यंत चालू  राहणार

महाविद्यालय मंजूरीची प्रक्रिया १५ जुलैपर्यंत करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली.

राज्य शासनास कायमस्वरूपी विना अनुदानावर महाविद्यालयांना मंजूरी देण्याच्या अधिकारासंबंधी तसेच नवी महाविद्यालये स्थापन करणे, अनुदानित किंवा कायमस्वरूपी विनाअनुदानितसाठी राज्य शासनाची मान्यता घेण्याबाबतची सुस्पष्टता आणणारी सुधारणा करण्यास मंत्रिमंडळाने मान्यता दिली. याबाबत विद्यापीठ अधीनियमात योग्य तो बदल करण्यासंदर्भातील अध्यादेश त्वरित निर्गमित करून त्याआधारे यावर्षीची नवीन महाविद्यालये, विद्याशाखा, विषय, अभ्यासक्रम, वाढीव तुकड्या आदींना मान्यता देण्याच निर्णय घेण्यात आला.

मंजूरीची प्रक्रिया पूर्ण करून मंजूरी केवळ सन २०१३-१४या शैक्षणिक वर्षापुरती सध्याच्या तरतुदीप्रमाणे १५ जून ऐवजी १५ जुलैपर्यंत करण्यास मान्यता दिली आहे.

००००० 